<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०१९</u>

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१९७–२०१९**

**<u>निशाणी क्र.१५१ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांनी त्यांच्या विरुध्द पारित झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.३१ व ३५ तर्फे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने वाटपाचे दादी करिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.३१ व ३५ हे आजारी असल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत न्यायालयात दाखल करता आली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द विना कैफियत आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांस त्यांची बाजू मांडण्याची संधी न मिळता दाव्याची सुनावणी पूर्ण झाल्यास प्रतिवादीचे पैशाचे स्वरुपात भरुन येणार नाही असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, सदर प्रतिवादी विरुध्द झालेला विना कैफियत आदेश करण्यात येऊन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे. त्यांचे कथन असे की, अर्जात नमुद कारण खोटे आहे. कैफियत दिर्घकाळा नंतर दिलेली असल्याने योग्य तो विचार करुन आदेश पारित करावा असे कथन केले आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांना उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. विहीत मुदतीत सादर न केल्यामुळे

त्यांच्या विरुध्द 'विना कैफियत' आदेश दि.१६/०८/२०१९ रोजी पारित करण्यात आला. जरी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांनी त्यांच्या विरोधात पारित झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन मिळणे करिता दाखल केला असला तरी केवळ तांत्रिक कारणास्तव नाकारणे योग्य नाही. प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रस्तुत प्रकरणी कैफियत दाखल करण्याची इच्छा दर्शवली आहे. प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांनी अर्जासोबत आपल्या कैफियतीची प्रत देखील अभिलेखावर दाखल केली आहे. यावरुन प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांना प्रस्तुत प्रकरणी हजर होऊन आपली कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची प्रामाणिक इच्छा असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांच्या विरुध्द पारित झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून उलट दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणार आहे. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.१५१ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना प्रत्येकी रक्कम रु.५००/– खर्चापोटी देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र.३१ व ३५ यांच्या विरुध्द पारित करण्यात आलेला 'विना कैफियत' आदेश रद्दबातल करण्यात येईल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.06.09 15:56:02 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः ०९/०६/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड